# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ६६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.१८ ऑक्टोबर, २०१४ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ६६ वी बैठक शनिवार, दि.१८ ऑक्टोबर, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| ५) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ७) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| १०) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ११) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १२) | सौ. मोहिते-पाटील पी. पी. | सदस्या |
| १३) | श्री. पाटील बी. पी. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १४) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १५) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा. डॉ. पाटील टी. आर. यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी, विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण) सोलापूर विभाग व डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ ०१ ] दि.२३ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठरावः दि.२३ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**१) पान क्र.२५ वर ठराव क्र.१२ मध्ये ठरावाच्या शेवटी "उर्वरित १० कर्मचाऱ्यांना शासनाच्या पत्राबाबत अवगत करावे." या वाक्याचा समावेश करण्यात आला.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] सोलापूर विद्यापीठातील अध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या सल्ला (मार्गदर्शन) सेवा (Consultancy Services) मानधनाची नियमावली विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील अध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शन सेवा (Consultancy Services) च्या कामासंदर्भातील व त्यांना या कामासाठी प्राप्त होणाऱ्या मानधनातील वाटपासंदर्भातील धोरणात्मक नियमावली तयार करण्यात आली असून, सोबत जोडली आहे. विद्यापीठातील अध्यापक व प्रशासकीय कर्मचारी Consultancy Services ची कामे करतात. या कामासाठी काही प्रकरणात त्यांना विद्यापीठ प्रशासनाची जागा, सर्व प्रकारची स्टेशनरी व विज वापरावी लागते तर काही प्रकरणात केवळ संबंधितांच्या बुध्दिमत्तेचा व कौशल्याचा वापर होतो. यासाठी संबंधितास मानधन वाटप करण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली असून ती वित्त व लेखा समितीच्या विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| **ठराव:** | विद्यापीठातील अध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी केलेल्या Consultancy Services कामाकरिता आदा करावयाच्या मानधनाच्या नियमावलीस मान्यता देऊन व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, सोलापूर विद्यापीठातील अध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या सल्ला (मार्गदर्शन) सेवा (Consultancy Services) मानधनाची नियमावली विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठातील अध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या सल्ला (मार्गदर्शन) सेवा (Consultancy Services) मानधनाच्या नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] विद्यापीठाच्या न्यायालयीन कामासाठी गठित करण्यात आलेल्या वकीलांच्या पॅनलची मुदत संपत असल्याने पुढील ३ वर्षासाठी मुदतवाढ देण्याबाबतची बाब विचारार्थ.**

(टिपणी: दि.११ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्र.५ वरील ठरावानुसार जिल्हा व सत्र न्यायालय, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण , उच्च न्यायालय मुंबई येथील न्यायालयीन प्रकरण विद्यापीठाच्या वतीने चालविण्यासाठी खालीलप्रमाणे वकीलांचे पॅनल तयार करण्यात आलेले आहे.

अ) जिल्हा व सत्र न्यायालय येथील केसेस करीता वकीलांचे पॅनेल :

१) ॲड. श्री. व्ही. वाय. पांढरे

२) ॲड. श्री. व्ही. एस. आळंगे

३) ॲड. श्री. व्ही. एन. पाटील

४) ॲड. श्री. पी. एस. जन्नु

५) ॲड. श्री. व्ही. आर. गुंडेली

६) ॲड. श्री. ए. डी. ठोकडे

७) ॲड. श्री. एस. व्ही. उजळंबे

ब) उच्च न्यायालय मुंबई येथील केसेस करीता वकीलांचे पॅनेल :-

१) ॲड. श्री. पी. एन. जोशी

२) ॲड. श्री. एस. डी. ठोकडे

३) ॲड. सचिन देशमुख - औरंगाबाद खंडपीठासाठी.

दि.११ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्र.५ अन्वये, वकीलांच्या पॅनलची मुदत ३ वर्षाकरीता निश्चित करण्यात आलेली होती. सदरची मुदत दि.१० नोव्हेंबर, २०१४ रोजी संपणार आहे.

सबब, वकीलांच्या पॅनलची मुदत संपणार असल्याने प्रस्तुत पॅनलला पुढील ३ वर्षासाठी मुदतवाढ देण्याबाबतची बाब विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठाच्या न्यायालयीन कामासाठी वकीलांची नावे मागवून वकीलांचे पॅनल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] दि.२३/०९/२०१४ च्या खरेदी समितीचा वित्त व लेखा समितीने शिफारशी केलेला कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.२३/०९/२०१४ रोजीच्या ख्ररेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता दिनांक ०७/१०/२०१४ च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस केली आहे.

सबब, दि.२३/०९/२०१४ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: दि.२३/०९/२०१४ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या, वित्त व लेखा समितीने शिफारस केलेल्या, कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (सीसी) नुसार, सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेस मान्यतेकरिता शिफारस करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १०३ नुसार, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याकरिता मे.बाहुबली ए.शहा ॲन्ड कंपनी, सोलापूर यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मे.बाहुबली ए.शहा ॲन्ड कंपनी, सोलापूर यांनी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन लेखापरीक्षण अहवाल दिलेला आहे. या लेखापरीक्षण अहवालावरील आक्षेप व लेखापरीक्षण अहवाल अंतिम करण्यासाठी (Account Code 1.50 h) नुसार मा.कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीची खालीलप्रमाणे उपसमिती गठीत केली.

१) श्री. बी. आर. गायकवाड

२) प्रा. डॉ. ए. ए. शेख

या समितीने दि.१८/०९/२०१४ व दि.१०/१०/२०१४ रोजी बैठक आयोजित करुन आक्षेपावर सविस्तर चर्चा केली व सादर केलेल्या कागदपत्रावर आक्षेप वगळण्याबाबतचा अहवाल सादर केला. दि.१०/१०/२०१४ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत विषय क्र. २ अन्वये लेखापरीक्षक यांनी सादर केलेला लेखापरीक्षण अहवाल, विभागाचा पूर्तता अहवाल व आक्षेप पूर्तता करण्याकरिता नेमलेल्या "वित्त व लेखा समितीच्या उपसमिती"ने केलेला शिफारस अहवाल विचारार्थ सादर करण्यात आला. त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव | विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५(२)(e) नुसार वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल, लेखापरीक्षण आक्षेपपूर्तता करण्याकरिता नेमलेल्या "वित्त व लेखा समितीच्या उपसमिती"ने केलेल्या शिफारशी मान्य करुन शिफारस अहवालासह व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणेस शिफारस करण्यात आली. |

सबब, वित्त व लेखा समितीने शिफारस केलेले सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल, लेखापरीक्षण आक्षेपपूर्तता समितीने केलेल्या शिफारशी मान्य करुन शिफारस अहवालासह महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (सीसी) नुसार व सोलापूर विद्यापीठ परिनियम क्र.४७४(६) अन्वये अधिसभेस शिफारस करण्याकरिता विचारार्थ).

**ठराव: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ चे कलम २८ (सीसी) नुसार, वित्त व लेखा समितीने शिफारस केल्याप्रमाणे**

**१) सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात आले.**

**२) लेखापरीक्षण आक्षेप पूर्तता समितीच्या T.A.D.A. to committee members and others आणि Purchase of vehicle बाबत आक्षेप वगळण्याच्या केलेल्या शिफारशी स्विकृत करण्यात आल्या.**

**३) Miscellaneous Engg. (JV No.222) बाबतचा आक्षेप वगळण्यात आला.**

**यानुसार अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**[ ०७ ] सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या दि.१५/११/२०१४ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यात येणार आहे.

सबब, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अधिसभेत सादर करण्यासाठी श्री. सलगर बी. एस. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ०८ ] सोलापूर विद्यापीठाचा सन २०१२-१३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सी. डी. स्वरुपात) तयार केलेला ९ वा वार्षिक अहवाल विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८(गग) नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल यांच्यावर विचार करणे व ते स्विकारणे आणि ते अधिसभेकडे पाठवणे".

सबब, सन २०१२-१३ चा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालील समितीचे गठन केलेले होते.

| | | |
|---|---|---|
| १ | डॉ. एस. व्ही. लोणीकर | अध्यक्ष (सध्या नियतवयोमानुसार सेवानिवृत) |
| २ | डॉ. श्रीकांत येळेगांवकर | उपाध्यक्ष |
| ३ | डॉ. डी. जी. कदम | सदस्य |
| ४ | डॉ. सुहास पुजारी | सदस्य |
| ५ | श्री. आर. एस. मेंते | सदस्य |
| ६ | श्रीमती ए.बी. चोपडे सहायक कुलसचिव | सदस्य सचिव |

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकुले व प्रशासनाकडून मागवून घेतलेल्या माहितीवर एकत्रित विचार करुन, वेळोवेळी बैठका घेऊन, सदरचा मराठी व इंग्रजी भाषेत (पुस्तक व सी.डी. स्वरुपात) तयार करुन व्यवस्थापन परिषदेकडे मान्यता देण्याबाबत कार्यवाहीसाठी शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर सदरच्या अहवालास अधिसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १०४(१) व (२) ची तरतुद खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कलम १०४(१) | The Annual Report of the University shall be prepared and published by the University and such report as approved by the Management Council shall be submitted to the Chancellor, State government and Senate. The Senate may consider the Annual Report in its meeting and may make recommendations as it deems fit. The management Council shall take appropriate action on the recommendations of the Senate and report the action taken to the Senate. |

| | |
|---|---|
| कलम १०४(२) | Namely-(z) The State Government shall cause the annual report of the University, received by it, to be laid before each House of the State Legislature. |

सबब, सन २०१२-१३ साठीचा वरील समितीने तयार केलेला ९ वा वार्षिक अहवाल विचारार्थ).

**ठराव: वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी गठित केलेल्या समितीने तयार केलेला सोलापूर विद्यापीठाचा सन २०१२-१३ चा ९ वा वार्षिक अहवाल दुरुस्तीसह स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**[ ०९ ] सोलापूर विद्यापीठाचा सन २०१२-१३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सी. डी. स्वरुपात) तयार केलेला ९ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ.**

(टिपणी : महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १०४ मधील तरतूदीनुसार, सोलापूर विद्यापीठाचा सन २०१२-१३ चा ९ वा वार्षिक अहवाल मराठी व इंग्रजीत तयार करण्यात आला असून, सदर अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.१८ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे.

सदरचा सन २०१२-१३ चा ९ वा वार्षिक अहवाल आगामी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत सादर करावा लागणार आहे.

सबब, सन २०१२-१३ चा ९ वा वार्षिक अहवाल अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठरावः सोलापूर विद्यापीठाचा सन २०१२-१३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सी. डी. स्वरुपात) तयार केलेला ९ वा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अधिसभेत सादर करण्यासाठी प्राचार्य श्री. पवार एस. के. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**<u>मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः</u>**

**[ १०(१) ] अभियांत्रिकी विद्याशाखेच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन पाठविण्यासाठी गठीत केलेल्या ICT समितीच्या दि.१३/१०/२०१४ रोजीच्या इतिवृत्तानुसार कार्यवाही करण्याची बाब मान्यतेसाठी.**

(टिपणी: श्री. राजेश अग्रवाल समितीने परीक्षेच्या कामकाजात ICT चा उपयोग करण्यासंदर्भात सुचविलेल्या उपाययोजनांवर कार्यवाही करण्यासाठी दिनांक १९ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या मा. व्य. प. ठराव क्र.१४ (२) अन्वये या शिफारशीची अंमलबजावणी परीक्षा विभागामार्फत टप्पाटप्याने करण्यात यावी तसेच या शिफारसीतील काही कामे ही अंत्यत गोपनिय व संवेदनशील असल्याने सदरचे कामकाज कोणाकडून करुन घ्यावे व या कामकाजाचे दर काय असावे हे ठरविण्याचे अधिकार मा.कुलगुरुना देण्याबाबतचा ठराव पारीत करण्यात आलेला होता.

तसेच वरील ठरावाच्या अनुषंगाने या शिफारशीं ची अंमलबजावणी करण्याकरिता मा. परीक्षा मंडळाच्या दि.०२/०९/२०१४ रोजीच्या बैठकेतील ठराव क्र. ११ अन्वये ICT समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीच्या दिनांक ०४/०९/२०१४, १८/९/२०१४ व १३/१०/२०१४ अशा सभा झालेल्या आहेत.

ICT समितीच्या दि.१३/१०/२०१४ रोजी झालेल्या समितीच्या इतिवृत्तानुसार ऑक्टोबर-२०१४ या परीक्षेपासून अभियांत्रिकी विद्याशाखेअंतर्गत अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका या ऑनलाईन पध्दतीने IQSS Pune या कंपनीद्वारे पाठविण्यास तसेच या कामाकरीता रुपये ११,०००/- प्रति दिवस येणारा खर्च त्यांना देण्यास व समितीने दिलेल्या शिफारीसी नुसार अंमलबजावणी व कार्यवाही करण्यासाठी सदरचा विषय मान्यतेसाठी सादर).

**ठरावः अभियांत्रिकी विद्याशाखेच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन पाठविण्यासाठी गठीत केलेल्या ICT समितीच्या दि.१३/१०/२०१४ रोजीच्या इतिवृत्तानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १०(२) ] प्रा. आर. ए. माशेलकर यांना डी. एस्सी. (D.Sc.) या मानद पदवीने सन्मानित करण्यासाठी अधिसभेस शिफारस करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सन २००४ मध्ये सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर आतापर्यंत विद्यापीठाने कोणत्याही व्यक्तीला मानद पदवीने सन्मानित केलेले नाही. यावर्षी विद्यापीठास नॅककडून मानांकन करुन घ्यावयाचे असल्याने मा.कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ९७ (१) च्या परंतुकान्वये, मा.कुलपती कार्यालयास दि.०९/०९/२०१४ रोजी पत्र पाठवून प्रा. आर. ए. माशेलकर यांना डी. एस्सी. (D.Sc.) पदवीने सन्मानित करण्यासाठी मा.कुलपतींची मान्यता मागितली होती. त्यास अनुसरुन मा.कुलपती कार्यालयाने दि.१६/०९/२०१४ च्या पत्रान्वये, विद्यापीठाने आतापर्यंत दिलेल्या मानद पदव्या व प्रा. आर. ए. माशेलकर यांना डी. एस्सी. (D.Sc.) या मानद पदवीने सन्मानित करण्याची बाब दि.०४/०१/२००८ रोजी झालेल्या जे. बी. व्ही. सी. च्या बैठकीतील निर्णयानुसार आहे काय? याची विचारणा केली होती. त्यास अनुसरुन विद्यापीठाने दि.२५/०९/२०१४ च्या पत्रान्वये, विद्यापीठाने आतापर्यंत एकही मानद पदवी दिलेली नाही आणि प्रा. आर. ए. माशेलकर यांच्याबाबत सविस्तर माहिती जसे प्रा. माशेलकर हे विविध परदेशी संस्थांचे सहकारी (fellow) आहेत, त्यांना आतापर्यंत "पद्मश्री", "पद्मभूषण" व "पद्मविभूषण" या पुरस्काराने मा.राष्ट्रपतींनी सन्मानित केलेले आहे, आतापर्यंत भारतातील व परदेशातील जवळपास ३१ विद्यापीठांनी त्यांना "डॉक्टर इन सायन्स (D.Sc.)" या पदवीने सन्मानित केलेले आहे इ.

मा.कुलपती कार्यालयाच्या दि.०७/१०/२०१४ च्या पत्रान्वये, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ९७ (१) च्या परंतुकान्वये, प्रा. आर. ए. माशेलकर यांना या विद्यापीठाच्या डी. एस्सी. (D.Sc.) या मानद पदवीने सन्मानित करण्यासाठी हा प्रस्ताव संबंधित अधिकारमंडळापुढे ठेवण्यास मान्यता दिलेली आहे.

सबब, प्रा. आर. ए. माशेलकर यांना डी. एस्सी. (D.Sc.) या मानद पदवीने सन्मानित करण्यासाठी अधिसभेस शिफारस करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: प्रा. आर. ए. माशेलकर यांना डी. एस्सी. (D.Sc.) या मानद पदवीने सन्मानित करण्याची अधिसभेस सर्वानुमते शिफारस करण्यात आली.**

**[ १०(३) ] NAAC संदर्भातील अनुषंगिक कामाच्या दृष्टीने प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील कार्यरत असलेल्या नियमित व कंत्राटी अध्यापकांच्या हिवाळी सुट्टयामध्ये केलेला बदल व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.**

(टिपणी: मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या दिनांक ०१ जानेवारी, २०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार विद्यापीठातील अनुदानित संकुलांना दिनांक १९/१०/२०१४ ते १२/११/२०१४ पर्यंत हिवाळी सुट्टी जाहिर करण्यात आलेली होती. तथापि प्रस्तुत विद्यापीठास NAAC मानांकन मिळण्यासंदर्भात राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्विकृती परिषद (NAAC) प्रस्तुत विद्यापीठास माहे जानेवारी २०१५ मध्ये भेट देणार आहे. त्याअनुषंगाने NAAC संदर्भातील कामकाजाच्या दृष्टीने विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील नियमित व कंत्राटी अध्यापकांच्या हिवाळी सुट्टयामध्ये बदल करण्यात आलेला आहे.

सर्व अध्यापकांना दिनांक १९/१०/२०१४ ते २६/१०/२०१४ पर्यंत हिवाळी सुट्टी जाहिर करण्यात आली असून, दिनांक २७/१०/२०१४ ते १२/११/२०१४ या कालावधीत सुट्टीत बजावलेल्या कर्तव्याच्या मोबदल्या तीन दिवसांना एक दिवस याप्रमाणे अर्जित रजा संबंधितांच्या खाती जमा करण्यात येणार आहेत. ह्या जमा झालेल्या अर्जित रजा संबंधित अध्यापक NAAC समितीच्या भेटीनंतर उपभोगू शकतील. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

**ठराव: NAAC संदर्भातील अनुषंगिक कामाच्या दृष्टीने प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील कार्यरत असलेल्या नियमित व कंत्राटी अध्यापकांच्या हिवाळी सुट्टयामध्ये केलेल्या बदलाची व इतर बाबींची नोंद घेण्यात आली.**

**[ १०(४) ] विद्यापीठात नॅक समिती भेट देणार आहे ही बाब लक्षात घेऊन विविध बांधकामाची, दुरुस्तीची कामे, रंगरंगोटीचे व परिसर सुशोभिकरणाची इ. कामे हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चालू दरसुची (D.S.R.-२०१४-१५) नुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंते यांचे कडून निविदा न मागविता करुन घेण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठास राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (NAAC) चे पथक जानेवारी २०१५ मध्ये भेट देणार आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठ परिसरातील खालील प्रमाणे विविध किरकोळ बांधकामाची, दुरुस्तीची कामे, रंगरंगोटीची व परिसर सुशोभिकरणाची कामे आवश्यकतेनुसार नॅक मूल्यांकनाचे पथक भेट देण्यापूर्वी करावी लागणार आहेत.

०१. अर्थ सायन्सेस इमारतीच्या म्युझियम मध्ये false ceiling करणे.

०२. रस्त्याच्या दुर्तफा Divider चे बांधकाम करुन रंगरंगोटी करणे.

०३. Divider मध्ये झाडे लावणे.

०४. सर्व संकुलाच्या इमारतीसमोर परिसर सुशोभिकरण करणे व वीटाचे curbing करणे.

०५. बांधकामाची रंगरंगोटीची इतर अत्यावश्यक कामे.

०६. भूशास्त्र संकुल, सामाजिकशास्त्र संकुल व संगणकशास्त्र संकुल परिसरा भोवती मुरुम पसरविण्याचे काम; व त्या अनुषंगाने इतर कामे.

सद्यस्थितीत अभियांत्रिकी विभागा कडे असलेले नगण्य मनुष्यबळ आणि कामाचा व्याप लक्षात घेता सदरची कामे, अभियांत्रिकी विभागाकडून वेळेत करणे शक्य होणार नाही.

तरी सदरचे कामे हे सुशिक्षित बेरोजगार अभियंते याचेकडून निविदा न मागविता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चालू दरसुची (D.S.R.-२०१४-१५) नुसार करुन घेणे संयुक्तिक होईल.

वरील तातडीची परिस्थिती लक्षात घेता विद्यापीठातील वर नमूद केलेली व अशा प्रकारची इतर कामे सुशिक्षित बेकार अभियंते यांचेकडून निविदा न मागविता चालू (D.S.R.-२०१४-१५) दराप्रमाणे करुन घेण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: विद्यापीठास नॅक समिती भेट देणार असल्याने विविध बांधकामाची, दुरुस्तीची, रंगरंगोटीची व परिसर सुशोभिकरणाची आणि इतर अनुषंगिक कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चालू दरसुची (D.S.R.-२०१४-१५) नुसार निविदा न मागविता नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंते यांच्याकडून लॉटरी पध्दतीने करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता घेण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |